# शिक्षण मंडळ कार्यालय, पुणेमहानगरपलिका
# कै. भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना
# जाहिर फेर निविदा क्रमांक — २४

शिक्षण मंडळ पुणे महानगरपलिका यांचेकडून खालील तपशीलात नमुद केलेल्या बाबींसाठी दोन लिफाफे (Two Bid System) पध्दतीने सिलबंद निविदा सक्षम संस्था,व्यक्ती, कंपनी यांचेकडून मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी व इतंर सविस्तर माहिती वरील पत्यावर समक्ष मिळेल,पोष्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

| | |
|---|---|
| **१. कोरे निविदा प्रपत्र विक्री —** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून शुक्रवार दिनांक १४/१/२०११ पासून शुक्रवार दिनांक २१/१/२०११ पर्यंत कार्यालयीन वेळेत फक्त शिक्षण मंडळ कार्यालयात मिळेल. |
| **२. निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ —** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून सोमवार दिनांक २४/०१/२०११ रोजी दुपारी १ वाजे पर्यंत |
| **३. निविदा उघडण्याची वेळ** | सोमवार दिनांक २४/०१/२०११ रोजी दुपारी ३ वा किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. |
| **४. निविदा दर** | सर्व करांसह व वाहतुकींसह देणे आवश्यक आहे. |

| अ.क्र. | तपशील | विक्रीची अंदाजे रक्कम | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १ | रद्दी | १,००,०००/— | ७५०/— |

**सूचना**

१. निविदा भरताना बयाणा रक्कम शेकडा १ टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा पाच टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. निविदा फॉर्म सोबत अटी,स्पेसिफिकेशन,निश्चित केलेली बयाणा रक्कम कार्यालयात भरून मुदतीत निविदा घेवून ती मुदतीत भरून देणे आवश्यक आहे.

२. कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे हा मा शिक्षण मंडळाचा अधिकार आहे व राहील

३. सदर निविदा त्या संबंधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट www.punecorporation.org वर पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व शिक्षण मंडळाचे नोटीस बोर्डवरही प्रसिध्द केली आहे.

**स्वाक्षरी/—**
**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ, पुणे महनगरपालिका**

**स्वाक्षरी/—**
**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ, पुणे महनगरपालिका**

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**स्पेसिफिकेशन सन २०१० – ११**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक – ०५/११/२०१०**
**वेळ – दुपारी – १.०० वा. पर्यंत**
**बयाना रक्कम रुपये : १,०००/–**
**रद्दी**

शिक्षण मंडळ, पुणे मनपा च्या सर्व शाळांतून वर्तमानपत्र, उत्तरपत्रिका, कालबाहय पुस्तके इ. **रद्दी** स्वखर्चाने उचलून घेवून जाणे व स्वच्छ करुन देणेबाबत –

**रद्दीचा प्रकार**

१. इंग्रजी वर्तमानपत्र
२. मराठी वर्तमानपत्र
३. उत्तरपत्रिका
४. प्रश्नोत्तर पत्रिका
५. पुस्तके
६. पुष्ठा, कागद, कचरा
७. मासिके इत्यादी.

सदर **रद्दी** चे किलोमध्ये दर देण्यात यावे.
सदरची **रद्दी** स्वखर्चाने घेऊन जावी लागेल.

सदर रद्दी चे बारीक तुकडे करून त्याचा नवीन कागद तयार करण्यासाठी पेपर मील करीता उपयोगात आणावे लागेल. इतरत्र रद्दीची विक्री करण्यात येऊ नये.

शिक्षण मंडळ कार्यालयाकडून विक्री करण्यात येणारी रद्दी ही इतर ठिकाणी न देता सदरची रद्दी पल्प करिता दिली जाईल अशी हमीपत्र कार्यालयाकडे सादर करावे लागेल.

**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ, पुणे महनगरपालिका**

**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ, पुणे महनगरपालिका**

# शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
# शिवाजी नगर, पुणे ४११००५.
# रद्दी विक्री निविदा अटी व शर्ती २०१०—११.

पुणे दैनिक बहुजन महाराष्ट्र व दैनिक आज का आनंद दि. १४/०१/२०११ मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्रं. २४ फेरनिविदा/भांडार/**रद्दी विक्री कामी विहीत नमुन्यातील निवीदा फॉर्म व निवीदा खालीलप्रमाणे:—**

शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. पुणे शैक्षणिक वर्ष २०१०—११ चे करिता खालील परिशिष्ठ अ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, परिशिष्ट क मध्ये नमूद केलेल्या **रद्दी विक्री** विशिष्ट मुदतीत करण्यासाठी निविदा मागविण्यात येत असून, त्या निवीदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.

**परिशिष्ठ अ**

१. **अटी व शर्ती :—**

१. निवीदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निवीदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.

२. निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन अ पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

३. **अ पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

**अ)** निवीदा रकमेच्या शेकडा १% या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा.शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD) किंवा रोख भरणा कार्यालयात भरावा.

**ब)** निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.

**क)** शासन अंगिकृत व इतर संस्थांकडून **रद्दी** खरेदीची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.

**ड)** निवीदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (Pan No.) छायांकित प्रत.

**इ)** निवीदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निवीदादार शासन किंवा शासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

**उ)** व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक.

**ए)** निवीदादाराची निवीदा कामाची पुर्तता करण्यासंबंधीची आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅकेचे प्रमाणपत्र (बॅक सॉलव्हान्सी) चालू वर्षाची निवीदेच्या एकूण किमतीच्या किमान २५ टक्के रकमेचे.

**ऐ) अ** पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे वेळी ठेकेदारांना समक्ष कामी सादर कराव्या लागतील.

४. **अ** पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास ब पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत मा शिक्षण मंडळाचा निर्णय अतिंम राहील.

५.	पाकीट **“ब”** मध्ये निविदा धारकाने **रद्दी** चे वाहतुकीसह दर दयावेत व दोनही पाकीटे सिलबंद करून एका मोठया पाकीटात भरून त्या पाकीटावर निवीदा धारकाचे नाव, निवीदा क्रं.नमुद करून तो सिलबंद करून सादर करावा.

**६. निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

१. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. **रद्दी चे** दर अंकी व अक्षरी लिहावेत.

२. निविदा स्विकारण्याचा,नाकारण्याचा पुर्ण अगर अशंत: मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा.शिक्षण मंडळास राहिल.

३. निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार मा.शिक्षण मंडळास आहे.

४. मान्य निवीदा धारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्राकावर करार करणे बंधनकारक आहे.करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविल्यास बयाण रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

५. मान्य निवीदादारास करार करतेवेळी **रद्दीच्या** जाहीर केलेल्या एकूण किंमतीच्या ५% रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD)किंवा रोखीने भरावी लागेल.

६. निवीदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २०१०—११ करिताच करार केल्यापासून बंधन कारक राहतील.

७. बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

८. **रद्दीची** विक्री करणेकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा.शिक्षण मंडळास राहिल.

९. दिलेल्या मुदतीत परिशिष्ठ ब मध्ये नमुदकेल्याप्रमाणे **रद्दी** शिक्षण मंडळ, पुणे मनपाच्या सर्व शाळांमधुन न घेतल्यास निविदादाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निवीदादारास ब्लॅकलिस्ट करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

१०.करारनाम्यानुसार विक्री करावयाचे **रद्दी** कार्यालयाने दिलेल्या मनपा शाळांमधुन स्वखर्चाने उचलण्याची जबाबदारी निविदादारावर आहे. मनपा शाळांमधुन **रद्दी** चे मुख्याध्यापकांच्या समक्ष वजन करुन होणारी रक्कम रोजच्या रोज मुख्याध्यापकांच्या सहीने त्याचे चलन करुन शिक्षण मंडळ कार्यालयात जमा करावी व त्यानंतरच सदरचा **रद्दी** उलण्याची कार्यवाही सुरु करावी. **रद्दी** उचलताना सदर शाळेचे मुख्याध्यापकांच्या समक्ष उचलण्यात यावा.

११.एकदा भरलेली निवीदा रदद् करता येणार नाही एखादयाला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास राहिल

१२. मा.शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. बयाणा रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१३. **रद्दी** विक्रीबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१४. निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास आहे.

१५. निविदा शनिवार दिनांक २४/०१/२०११ रोजी दुपारी ३ वाजता किंवा मा. शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील.वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**पुणे.**
**दिनांक:—**

**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ, पुणे महनगरपालिका**

**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ, पुणे महनगरपालिका**

## प्रतिज्ञालेख

मी,श्री.————————————————————————————— वय ———–वर्ष, व्यवसाय – धंदा, राहणार ———–या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निविदा भरलेली आहे व निविदेसोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज ———————————————————————— निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,वरील निविदेच्या,फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या रोजी पुणे येथे सही करुन निविदेसोबत दाखल करित आहे.

पुणे:–

दिनांक:–

**पुरवठा धारकाची नाव,सही व शिक्का**